254

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १३/०२/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.एनएएक्स-१०२३/प्र.क्र.१८२/विशा-१ब, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२४.

**विषय :-** समाजामध्ये जागरुकता, धार्मिक सलोखा निर्माण करुन गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी पोलीसांमार्फत राबविण्यात येणाऱ्या " Community Policing " या योजनेतंर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत...

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. एनएएक्स-१०२३/प्र.क्र.१८२/विशा-१ब, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०२१२१८४११९०२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
कार्यासन अधिकारी, का.क्र. ३३

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये " सर्वसाधारण " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

समाजामध्ये जागरुकता, धार्मिक सलोखा निर्माण करुन गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी पोलीसांमार्फत राबविण्यात येणाऱ्या "Community Policing" या योजनेतंर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.......

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: एनएएक्स १०२३/प्र.क्र.१८२/विशा-१ब**

मंत्रालय (मुख्य इमारत), दुसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १२ फेब्रुवारी, २०२४.

**संदर्भ :-** पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/३३/७१२५/हिवाळी अधिवेशन २०२३/४७/२०२३, दि.३१.१०.२०२३.

**प्रस्तावना:-**

राज्यात सर्व धर्म, जाती /जमातीचे लोक राहत असून त्यांच्यामध्ये बंधुभाव, मैत्रीचे संबंध राहणे आवश्यक आहे. धार्मिक सण, उत्सव व मिरवणुका इत्यादीच्या वेळी ताणतणाव, मतभेद निर्माण होणार नाहीत यासाठी आवश्यक ती काळजी घ्यावी लागते. आवश्यक ती काळजी घेऊनही दुर्दैवाने काही अनुचित प्रकार घडल्यास सर्व जाती/धर्माच्या प्रमुख व्यक्तींच्या सहकार्याने प्रकरणे चिघळणार नाहीत यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतात. त्याचप्रमाणे जनतेचा पोलीसांच्या कामामध्ये सहभाग घेऊन गुन्हेगारीचे प्रमाण कमी करणे, जनतेच्या मनात पोलीसांबद्दल गाढ विश्वास निर्माण करुन जनता व पोलीस यांच्यामध्ये सुसंवाद निर्माण करणे, यासाठी मोहल्ला एकता समिती, शांतता समिती, मोहल्ला पंचायत, तंटामुक्त समिती, पोलीस मित्र आणि इतर छोटे स्थानिक पातळीवरचे उपक्रम राबवून स्थानिक पोलीसांनी यापूर्वीच शांतता राखणे अशा उपक्रमांवरील खर्चास "Community Policing" या योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

समाजामध्ये जागरुकता, धार्मिक सलोखा निर्माण करुन गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी पोलीसांमार्फत राबविण्यात येणाऱ्या "Community Policing" या योजनेकरीता सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात विधानमंडळाच्या डिसेंबर-२०२३ हिवाळी अधिवेशनात बाब क्रमांक-२३ अन्वये वित्त विभागाने पुरवणी मागणीद्वारे रु. १,००,००,०००/- (रु.एक कोटी फक्त) इतका निधी मंजूर केला असल्याने सदरचा निधी वितरीत करण्यास व खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी आणि त्यांच्या अंतर्गत आहरण व संवितरण अधिकाऱ्यास आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. सदरचा खर्च " मागणी क्र.बी-१,२०५५, पोलीस (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (१५) संगणक सांकेतांक क्रमांक २०५५०A११२ याखालील “५०-इतर खर्च” "Community Policing" या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या सन २०२३-२४ च्या पूरक अनुदानातून भागविण्यात यावा.

४. पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत असलेला संपूर्ण निधी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

Scanned with CamScanner

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.८२/२०२४/व्यय-७, दि.२५.०१.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०२१२१८४११९०२२९ असा असून डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJESH SHALIGRAM GOVIL

Digitally signed by RAJESH SHALIGRAM GOVIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=c549410b2251df8c92783a2da17afcacbe7f8fe3a4fd88f156fea84433871f11, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=0ED8916DB8E68105B4125438A1606D0F12978EECB0C9464E868A33D643272018, cn=RAJESH SHALIGRAM GOVIL
Date: 2024.02.12 18:50:10 +05'30'

(राजेश गोविल)
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, मंत्रालय, मुंबई
६. पोलीस आयुक्त, मुंबई.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर
९. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग यांचे स्वीय सहायक.
१०. संचालक,नागरी संरक्षण संचालनालय, मुंबई
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / बांद्रा.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. कक्ष अधिकारी (अर्थ-१), गृह विभाग,मंत्रालय, मुंबई.
१४. वित्त विभाग, व्यय-४ / व्यय-७, मंत्रालय, मुंबई.
१५. सामान्य प्रशासन विभाग, कार्या.३३ व का.२१ (रोखशाखा), मंत्रालय, मुंबई-३२.
१६. निवडनस्ती (कार्यासन विशा-१अ).



Scanned with CamScanner